महानिर्मिती

एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॉन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला, लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९, दूरध्वनी क्र.०२२-६९४२५०००; इमेल : agmhrrc@mahagenco.in

क्र.महानिर्मिती/स.म.व्य.(से.प्र./मासं)/ No 05168 दिनांक: 5 JUN 2023

# सूचना

**महानिर्मिती जाहिरात क्र.०१/२०२३ अन्वये सुरक्षा संवर्गातील कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाच्या सरळसेवा जाहिरातीस अनुसरुन पात्र उमेदवारांच्या शारीरिक क्षमता (PET) आणि मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणीबाबत.**

**संदर्भ:-** महानिर्मिती जाहिरात क्र.०१/२०२३

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०१/२०२३ अन्वये कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), या पदाची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता सरळसेवेची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरील पदासाठीची ऑनलाईन परीक्षा दि.१५.०४.२०२३ रोजी पार पाडण्यात आली आहे. ऑनलाईन परीक्षेसाठी उपस्थित सर्व उमेदवारांचे गुण कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदासाठीच्या अंतिम निवड यादीसोबत प्रसिध्द करण्यात येतील.

सध्यस्थितीत, जाहिरात केलेल्या पदांकरीता गुणानुक्रमे १:२० या प्रमाणात तात्पुरते पात्र ठरत असलेल्या उमेदवारांची जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पुढील प्रमाणे शारिरीक क्षमता चाचणी (PET) व मनोविश्लेषणात्मक चाचणी घेण्यात येणार आहे.

**शारिरीक क्षमता चाचणी**

**पुरुष उमेदवार :-**

| अ.क्र | प्रकार | पात्रतेचे निकष |
|---|---|---|
| १ | ८०० मीटर धावणे. | अ) ३ मिनटांच्या आत ८०० मीटर अंतर पुर्ण केल्यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) ३ मिनिट १ सेकंद ते ३ मिनिट ३० सेकंदांच्या आत ८०० मिटर अंतर पुर्ण केल्यास ७ गुण देण्वात येतील.<br>क) ३ मिनिट ३१ सेकंद वा त्यापेक्षा जास्त कालावधीत ८०० मिटर अंतर पार करण्यास लागल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल. |
| २ | ५० कि.ग्रॅ. वजन खाद्यांवर घेऊन ६० मीटर वाहुन नेणे. | अ) उमेदवार ५० कि.ग्रॅ. वजन खाद्यांवर घेऊन ६० मीटर अंतर वाहुन नेवू शकल्यास त्यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) उमेदवार ५० कि.ग्रॅ. वजन खाद्यांवर घेऊन ६० मीटर अंतर वाहुन नेवू न शकल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ३ | १५ फुट उंचीपर्यंत रस्सीवर चढणे व उतरणे. | अ) १५ फुट उंचीपर्यंत रस्सीवर केवळ हाताचा वापर करुन चढणे व उतरणे यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) १५ फुट उंचीपर्यंत रस्सीवर हात व पाय या दोन्हींचा वापर करुन चढणे व उतरणे यास ७ गुण देण्यात येतील.<br>क) उमेदवार १५ फुट रस्सी चढू न शकल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ४ | ३० उठक बैठक (Sit Ups) किंवा १० पुलअप्स्. | अ) ३० उठक बैठक ५० सेकंदात पुर्ण केल्यास १० गुण देण्यात येतील किंवा १० पुलअप्स् काढण्यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) ३० उठक बैठक ५१ ते ६० सेकंदाच्या आतमध्ये पुर्ण केल्यास ७ गुण देण्यात येतील किंवा ७ ते ९ पुलअप्स् काढण्यास ७ गुण देण्यात येतील.<br>क) ६१ सेकंद व त्यापेक्षा जास्त कालावधी ३० उठक बैठक काढण्यास लागल्यास किंवा ७ पुलअप्स् काढण्यास उमेदवार अक्षम झाल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. |

**महिला उमेदवार :-**

| अ.क्र | प्रकार | पात्रतेचे निकष |
| --- | --- | --- |
| १ | ८०० मीटर धावणे | अ) ४ मिनटांच्या आत ८०० मीटर अंतर पुर्ण केल्यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) ४ मिनिट १ सेकंद ते ४ मिनिट ३० सेकंदांच्या आत ८०० मिटर अंतर पुर्ण केल्यास ७ गुण देण्यात येतील.<br>क) ४ मिनिट ३१ सेकंद वा त्यापेक्षा जास्त कालावधीत ८०० मिटर अंतर पार करण्यास लागल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल. |
| २ | ४० कि.ग्रॅ. वजन खांद्यावर घेवुन ६० मीटर वाहुन नेणे | अ) उमेदवार ४० कि.ग्रॅ. वजन खांद्यावर घेऊन ६० मीटर अंतर वाहुन नेवू शकल्यास त्यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) उमेदवार ४० कि.ग्रॅ. वजन खांद्यावर घेऊन ६० मीटर अंतर वाहुन नेवू न शकल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ३ | १३ फुट उंचीपर्यंत रस्सीवर चढणे व उतरणे. | अ) १३ फुट उंचीपर्यंत रस्सीवर केवळ हाताचा वापर करुन चढणे व उतरणे यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) १३ फुट उंचीपर्यंत रस्सीवर हात व पाय या दोन्हीचा वापर करुन चढणे व उतरणे यास ७ गुण देण्यात येतील.<br>क) उमेदवार १३ फुट रस्सी चढू न शकल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ४ | २५ उठक बैठक (Sit Ups) किंवा ८ पुलअप्स्. | अ) २५ उठक बैठक ५० सेकंदात पुर्ण केल्यास १० गुण देण्यात येईल किंवा ८ पुलअप्स् काढण्यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) २५ उठक बैठक ५१ ते ६० सेकंदाच्या आतमध्ये पुर्ण केल्यास ७ गुण देण्यात येईल किंवा ५ ते ७ पुलअप्स् काढण्यास ७ गुण देण्यात येतील.<br>क) ६१ सेकंद व त्यापेक्षा जास्त कालावधी २५ उठक बैठक काढण्यास लागल्यास किंवा ५ पुलअप्स् काढण्यास उमेदवार अक्षम झाल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. |

कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) या पदाकरिता महानिर्मिती कंपनीत कार्यरत पहारेकरी / सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांसाठी शारिरीक क्षमता चाचणीचे (PET) निकष खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | प्रकार | पात्रतेचे निकष |
| --- | --- | --- |
| १ | ८०० मीटर धावणे | अ) ४ मिनटे ३० सेकंदाच्या आत ८०० मीटर अंतर पुर्ण केल्यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) ४ मिनिट ३१ सेकंद ते ५ मिनिट ०० सेकंदांच्या आत ८०० मिटर अंतर पुर्ण केल्यास ७ गुण देण्यात येतील.<br>क) ५ मिनिट ०१ सेकंद वा त्यापेक्षा जास्त कालावधीत ८०० मिटर अंतर पार करण्यास लागल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल. |
| २ | ४० कि.ग्रॅ. वजन खांद्यावर घेवुन ६० मीटर चालणे | अ) उमेदवार ४० कि.ग्रॅ. वजन खांद्यावर घेऊन ६० मीटर अंतर वाहुन नेवू शकल्यास त्यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) उमेदवार ४० कि.ग्र. वजन खांद्यावर घेऊन ६० मीटर अंतर वाहुन नेवू न शकल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ३ | ०९ फुट उंच रस्सीवर चढणे | अ) ०९ फुट उंचीपर्यंत रस्सीवर केवळ हाताचा वापर करुन चढणे व उतरणे यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) ०९ फुट उंचीपर्यंत रस्सीवर हात व पाय या दोन्हीचा वापर करुन चढणे व उतरणे यास ७ गुण देण्यात येतील.<br>क) उमेदवार ०९ फुट रस्सी चढू न शकल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ४ | २० सीट-अप्स किंवा ०४ पुल-अप्स | अ) २० उठक बैठक ५० सेकंदात पुर्ण केल्यास १० गुण देण्यात येतील किंवा १० पुलअप्स् काढण्यास १० गुण देण्यात येतील.<br>ब) २० उठक बैठक ५१ ते ६० सेकंदाच्या आतमध्ये पुर्ण केल्यास ७ गुण देण्यात येतील किंवा ३ ते ४ पुलअप्स् काढण्यास ७ गुण देण्यात येतील.<br>क) ६१ सेकंद व त्यापेक्षा जास्त कालावधी २० उठक बैठक काढण्यास लागल्यास किंवा ३ पुलअप्स् काढण्यास उमेदवार अक्षम झाल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. |

* वरील नमूद शारिरीक क्षमता चाचणींच्या कोणत्याही टप्प्यात उमेदवार अपात्र / आवश्यक वेळेत संबंधित चाचणी पूर्ण न करु शकल्यास, सदरील उमेदवारास बाद ठरविण्यात येईल व पुढील टप्प्यात त्याचा विचार करण्यात येणार नाही.

कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) या पदाकरिता जाहिरातीत देण्यात आलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, इतर सर्व अटी व शर्तींच्या अधीन राहून उपरोक्त पात्रता यादी तयार करण्यात आली आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच सदरील यादी ही उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या माहितीची कोणत्याही कागदपत्रांची पडताळणी न करता तयार करण्यात आली असून,भविष्यात उमेदवारांना कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेदरम्यान त्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेली माहिती सिध्द करणे क्रमप्राप्त आहे. तसेच शारिरीक क्षमता चाचणी (PET) व मनोविश्लेषणात्मक चाचणी परीक्षेच्या पात्रता यादीत नावाचा समोवश आहे, म्हणून अंतिम निवड यादीत समावेश करणेबाबत उमेदवारास कोणताही अधिकार नसेल. सदरील यादी ही निवड अथवा प्रतिक्षा यादी नाही याची देखील उमेदवारांनी नोंद घ्यावी.

वरील नमूद चाचणी परीक्षेबाबत संबंधित बाहयस्त्रोत संस्थेमार्फत चाचणीवेळी सूचना देण्यात येतील. सदरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे उमेदवारास आवश्यक आहे.शारिरीक क्षमता चाचणी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांची मनोविश्लेषणात्मक चाचणी घेण्यात येईल.

जे उमेदवार शारिरीक क्षमता चाचणीकरीता तात्पुरते पात्र झालेले आहेत अशा उमेदवारांना याबाबतची सूचना मोबाईलवर SMS व्दारे देखील कळविण्यात येईल. उमेदवारांना देण्यात आलेल्या शारिरीक क्षमता चाचणीच्या तारखेत अथवा वेळेत कोणताही बदल केला जाणार नाही. तसेच सदरील चाचणी दरम्यान पाऊस किंवा इतर कारणास्तव ठराविक दिवसाची शारिरीक क्षमता चाचणी (PET) व मनोविश्लेषणात्मक चाचणी पुढे ढकलण्यात येऊ शकते. तथापि, शारिरीक क्षमता चाचणी (PET) व मनोविश्लेषणात्मक चाचणीची तारीख पुढे ढकलण्यात आल्यास संबंधित उमेदवारांना राहण्याची व इतर सोय स्वखर्चाने करावी लागेल व त्याबाबतचा कुठलाही मोबदला महानिर्मिती कंपनीमार्फत अदा करण्यात येणार नाही. तसेच जे उमेदवार दिलेल्या वेळेवर हजर राहणार नाहीत, त्यांना या प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

उमेदवारांनी शारिरीक क्षमता चाचणी करीता येताना सोबत अर्जाची छायाप्रत, जाहिरातीत नमूद शारिरीक निकष पूर्ण करीत असल्याबाबतचे व शारिरीक क्षमता चाचणी देण्यास पात्र असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र (Medical Certificate) आणि हमीपत्र (Undertaking) सोबत घेऊन येणे आवश्यक आहे अन्यथा पुढील प्रक्रियेमध्ये समावेश केला जाणार नाही. सोबत वैद्यकीय प्रमाणपत्र (Medical Certificate) व हमीपत्र (Undertaking) यांचा नमुना जोडला आहे.

कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाकरीता दि.१५.०४.२०२३ रोजी पार पडलेल्या ऑनलाईन परीक्षेत उपस्थित सर्व उमेदवारांना प्राप्त झालेले गुण हे महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाच्या अंतिम निवड यादीसोबत प्रसिध्द करण्यात येतील, याची सर्व उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

शारिरीक क्षमता चाचणीसाठी १:२० प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र (Medical Certificate) व हमीपत्र (Undertaking) यांचा नमुना प्राप्त करुन घेण्यासाठी येथे ↵ क्लिक करावे.

**" कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) " या पदाच्या शारिरीक क्षमता चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.** ↵

**" कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) " या पदाच्या शारिरीक क्षमता चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.**
**(महानिर्मिती कार्यरत कर्मचारी)** ↵

**" वैद्यकीय प्रमाणपत्र (Medical Certificate) व हमीपत्र (Undertaking) " चा नमूना** ↵

तसेच शारिरीक क्षमता चाचणी (PET) व मनोविश्लेषणात्मक चाचणी करीता उमेदवारांची तुकडी खालीलप्रमाणे :-

**" कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) " या पदाकरीता शारिरीक क्षमता चाचणीसाठी दि.१९.०६.२०२३ रोजीच्या उमेदवारांची यादी.** ↵

**" कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) " या पदाकरीता शारिरीक क्षमता चाचणीसाठी दि.२०.०६.२०२३ रोजीच्या उमेदवारांची यादी.** ↵

C:\Users\08013471\Downloa

**" कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) " या पदाकरीता शारिरीक क्षमता चाचणीसाठी दि.२१.०६.२०२३ रोजीच्या उमेदवारांची यादी.**

तसेच, शारिरीक क्षमता चाचणी (PET) अंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची मनोविश्लेषण चाचणी दि.२२.०६.२०२३ रोजी घेण्यात येईल.

***टिप:-**

शारिरीक क्षमता चाचणी (PET) व मनोविश्लेषणात्मक चाचणी परीक्षेनंतर उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया राबविण्यात येईल. याविषयी स्वतंत्र सूचना महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**शारिरीक क्षमता चाचणीची तारीख, वेळ आणि ठिकाण खालीलप्रमाणे आहे.**

**तारिख :-** १९.०६.२०२३ ते २२.०६.२०२३

**वेळ :-** सकाळी ०८.०० ते दुपारी ०२.०० पर्यंत

**ठिकाण:-** मेस्को करिअर ॲकेडमी, द्वारा मेस्को इंटरप्राईजेस, टी.सी.पी.सी. कॉम्प्लेक्स, कारंजे नाका जवळ, सातारा-४१५००२
[MESCO Career Academy, C/o MESCO Enterprises,TCPC Complex, Near Karanje Naka, Satara-415002]

**(डॉ.धनंजय सावळकर)**
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती